# पोलीस ठाण्यावर दगडफेक प्रकरणात आतापर्यंत 23 जणांना अटक

## अन्य आरोपींची धरपकड सुरु





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** – नागपुरी गेट ठाण्यावरील दगडफेक प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत 23 जणांना अटक केली असून, अन्य आरोपींची धरपकड सुरु आहे. या आरोपींपैकी एकाला सोमवारपर्यंतची पोलिस कोठडी मिळाली असून, 17 आरोपींना रविवारी जेल रवाना करण्यात आले आहे.

गाझियाबाद येथे स्वामी यती नरसिंहानंद यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर शुक्रवारी रात्री नागपुरी गेट पोलिस ठाण्यावर मुस्लीम समाजाच्या नागरिकांनी धडक देऊन रोष व्यक्त करीत दगडफेक केली आणि वाहनांची तोडफोड केली. या घटनेनंतर पोलिसांनीही प्रतीउत्तर देत असताना जमावाला पांगविण्यासाठी सौम्य लाठीचार्ज करून, अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडल्या. त्यामुळे प्रचंड खळबळ उडाली होती. या घटनेमुळे जवळपास 15 पोलिस जखमी झाले, तर शेकडो वाहनांची तोडफोड झाल्याचे दिसून आले होते. या घटनेनंतर नागपुरी गेट पोलिस ठाण्यात 1200 पेक्षा अधिक आरोपींविरुध्द गुन्हे नोंदविण्यात आले. तसेच पोलिसांनी याप्रकरणात आतापर्यंत 26 आरोपी निष्पन्न करून, त्यापैकी 23 जणांना अटक केली आहे. अन्य आरोपींची धरपकड सुरु ठेवली आहे. या घटनेच्या अनुषंगाने पोलिसांनी चौकाचौकात तगडा बंदोबस्त तैनात केला असून, शनिवारी व रविवारी नागपुरी गेट परिसरात शांततापूर्ण वातावरण पहायला मिळाले.

### शेकडो दुचाकी घेतल्या ताब्यात

दगडफेकीच्या घटनेंतर प्रचंड गोंधळ उडाला होता. या परिसरात नागरिकांची धावपळ सुरु झाली होती. अशातच दगडफेक करणारे व बघ्याची गर्दीत असणार्यांनी आपआपल्या दुचाकी सोडून पलायन केले. पोलिसांनी लाठीचार्ज केल्यानंतर अनेकांनी दुचाकी जागेवरच सोडून पलायन केले. त्यामुळे रस्त्यावर पडून असलेल्या शेकडो दुचाकी पोलिसांनी ताब्यात घेतल्या.

### आठ वाहनांचे नुकसान

या दगडफेकीत गाडगेनगरचे एसीपी यांचे शासकीय वाहन क्र. एमएच 27 डीएल 5919, फ्रेजरपुरा विभागाचे एसीपी यांचे शासकीय वाहन क्र.एमएच 27 डीएल 5917, गाडगेनगरचे पोलिस निरीक्षक यांचे वाहन क्र. एमएच 27 डीएल 7229, नांदगाव पेठ सीआरचे शासकीय वाहन क्र. एमएच 27 डीए 6232, वलगांवचे सीआर वाहन क्र. एमएच 27 एए 183, शहर वाहतुक शाखेचे वाहन क्र. एमएच 12 आरवाय 7267, नागपुरी गेटचे वाहन क्र. एमएच 27 डीएल 7226, सेकण्ड मोबाईल एमएच 27 एए 182, गाडगे नगर सीआर-2 एमएच 27 डीए 6230 अशा चारचाकी वाहनासह एसआयडी अंमलदार यांचे वाहन एमएच 27 एए 661 तसेच दुचाकी व इतर शासकीय वाहनाचे 5 ते 6 लाख रुपयाचे नुकसान झाले आहे.

### अशी आहेत आरोपींची नावे

मोहसिन खान हमीद खान, अनिकेत किशोरसींग चंदेल उर्फ समिर, सैयद जुबेर सैयद जावेद, ॲड. उमर चाउस, सलीम खान अब्दुल गफ्फार, शेख महेबुब शेख अजीज, शेख ईशाद शेख गफ्फार, मोहम्मद सलमान, शफी मन्सुरी शेख हातम, शफीउद्दीन शरफोद्दीन, शेख अहेमद शेख इस्माईल, मोहम्मद वसिम मो.छोटु भाई, आमीर सोहेल (इंजिनिअर), रिजवान अहेमद शेख बशिर, मोहम्मद सलिम अब्दुल गफ्फार, अशफाक ताज, मुज्जमील खान, युसुफ पटेल, शफी मंसुरी, हाफीज मुज्जमील अब्दुल अहेमद कदीर, मोहम्मद फैजान अब्दुल करीम, वहीद फुलवाला (नागपुरी गेट चौक), मोहम्मद नावेद, आहाद अली सैय्यद अली, कामील खान फदीम खान (रा. बाबा चौक), शेख रिझवान शेख हबीब (रा. फ्रेन्ड्स स्कुलजवळ, हबीब नगर) असे आरोपी निष्पन्न झाले असून, या आरोपींसह इतर अंदाजे 1000 ते 1200 पेक्षा अधीक आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# 10 लाखांचा गुटखा पकडला

## साबणपुऱ्यात सीआयु पथकाची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )**– पोलिस आयुक्त यांच्या सीआययु पथकाने रविवारी दुपारच्या सुमारास साबनपुर्यातील कृष्णा सोनपापडी नामक व्यापारी प्रतिष्ठानावर धाड टाकून आणखी एका गुटखा तस्कराच्या मुसक्या आवळल्या आहेत. या प्रतिष्ठानातून विविध कंपन्याचा 10 लाख रुपये किमंतीचा गुटख्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस सुत्रानुसार, 6 ऑक्टोबर रोजी सि.आय.यु. पथक खोलापुरी गेट हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त माहिती मिळाली की, साबनपुरा येथील श्रीनिवास राधाकीसन झंवर हा त्याच्या राहत्या घरून शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा अवैद्यरीत्या विक्री करीत आहे. या माहीतीवरून पोलिसांनी त्याच्या दुकानासह त्याच्या घराची झडती घेतली असता, शासनाने प्रतिबंधीत अन्न पदार्थ असणारा गुटखा मिळुन आला. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, असता गुटख्याचा माल विक्री करण्याकरीता शेख चांद (रा. बडनेरा) याने आणुन टाकल्याचे सांगीतले. पोलिसांना घटनास्थळावर वेगवेगळ्या प्रकारचा गुटखा आढळून आला. यामध्ये पानमसाला बाजीराव गोल्ड, पान रसीया पान मसाला, सुगंधीत तंबाखु मस्ताणी ब्रांड, पानमसाला नागपुरी प्रिमीयम, पानमसाला विमल, पानमसाला बाजीराव गोल्ड निळी, गुटखा नजर 9000, गुटखा नजर 5000, गुटखा नजर 1000, गुटखा नजर प्रिमीयम, पानमसाला पानबहार, पानपराग प्रिमीयम पान मसाला, पानमसाला जॅकपॉट 777, पानमसाला विमल झिपर, सुगंधीत तंबाखु ङ्क1 असा एकुन 9 लाख 1 हजार 960 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या घटनेच्या माहितीवरून अन्न सुरक्षा अधिकारी गजानन वा. गोरे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. त्याच्या लेखी तक्रारीवरुन खोलापुरी गेट पोलिसांनी आरोपी 1) श्रीनिवास राधाकीसन झंवर व शेख चांद यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानव कायदा 2006 चे कलम 59 तसेच भारतीय न्याय सहीता कलम 223, 274, 275, 123 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# श्वानाच्या हल्ल्यात मसण्याउद ठार

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.6 )**– श्वानाच्या हल्ल्यात मसण्याऊद नामक वन्यप्राण्याचा मृत्यू झाल्याची घटना मोर्शीत शहरात 4 ऑक्टोबर रोजी रात्री 9 वाजताच्या सुमारास उघडकीस आली.

वारसा संस्थेच्या हेल्प लाईनवर माहिती मिळाली होती की, दुर्गानगर येथील सतीश उमक यांच्या घराजवळ श्वानाने एक वन्यप्राणी पकडून ठेवला आहे. या माहितीवरून वारसा संस्थेचे अध्यक्ष अभिलाष व्यवहारे यांनी लगेच टीमला घेऊन घटनास्थळ गाठले. त्यांनी पाहणी केल्यानंतर सदर प्राणी उदमांजर(मसण्याउद) असल्याचे निर्दशनास आले. परंतू तो श्वानांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याचे दिसून आले. त्यांनी तत्काळ मसण्याउद प्राण्याला उपचारासाठी पशु चिकित्सालयात नेले. त्याच्यावर प्रथमोपचार केले, परंतू त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याला वनविभाग कार्यालयात नेण्यात आले. वनविभागाने त्याची नोंद घेण्यात येऊन त्याचा अंत्यविधी केला.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# परतवाडा ठाण्यात पुन्हा कठपुतळीचा खेळ

- ठाणेदार सुरेश मस्के कंटाळले आणि वैद्यकिय रजेवर गेले ?
- तदर्थ ठाणेदार संदीप चव्हाणांचा पुन्हा राज सुरु
- आता पोलीस महानिरीक्षकांनीच लक्ष घालण्याची गरज

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.6 ) –** एसपींकडून एकाला पोटाशी, एकाला पाठीशी घेण्याचा प्रकार ग्रामीण पोलीस दलात अस्थैर्य निर्माण करणारे असल्याचे जगजाहिर आहे. एका ठाणेदाराकरिता अख्खा जिल्हा वेठीस धरल्या जात असतानाही एसीबी चौकशी सुरु असलेल्या तदर्थ ठाणेदार संदीप चव्हाणांवरील पोलीस अधिक्षकांचे असलेले विशेष प्रेम कमी होताना दिसत नाही. परतवाडा पोलीस स्टेशनला सुरेश मस्के हे कायमस्वरुपी ठाणेदार दिलेले असतानाही कामात लुडबूड करणाऱ्या ठाणेदारांची तक्रार एसपींकडे




केल्यावर त्याच्या दालनात यावर सुनावणी झाली नसल्याची माहिती आहे, त्यामूळे मस्केंना वैदयकिय रजेवर जाण्याचेच योग्य वाटले असावे.

हा कठपुतळीचा खेळ बंद करण्याकरिता परतवाडा ठाण्यापुरते तरी पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांनी अमरावती जिल्ह्यात लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

नुकतीच परतवाडा ठाणेदार पदी सुरेश मस्के यांचा नियुक्ती आदेश काढण्यात आला होता. मात्र अचलपूर वाहतूक शाखेची जबाबदारी असलेले संदिप चव्हाण परतवाडा ठाणेदार पदाची खुर्ची सोडायला तयार नव्हते. त्यामुळे मस्के फक्त नावालाच ठाणेदार म्हणून पाठविण्यात आले की अशी चर्चा आहे. परतवाडा ठाणेदार सुरेश मस्के हे वैद्यकिय रजेवर गेल्याने आपोआपच तदर्थ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्याकडे नेहमीप्रमाणे परतवाड्याचा प्रभार आला.

### निवडणूक आयोगात तक्रार करण्याची तयारी

परतवाडा येथील अनेक महिन्यांपासूनचा प्रभार तदर्थ ठाणेदार संदीप चव्हाण कडेच आहे, आणि नावाला त्यांच्याकडे अचलपूर वाहतूक शाखेचा कारभार देखील देण्यात आला. तसेच अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयमधील डीएसबी आणि जिल्हा वाहतूक शाखेचा कारभार एकच पोलीस निरीक्षक सतीश पाटील सांभाळत आहे. त्यामुळे हेच दोन पोलीस अधिकारी अमरावती ग्रामीण पोलीस दलात उत्तम अधिकारी आहेत का ? जे 4 ते 5 पोलीस निरीक्षक नियंत्रण कक्षात जमा केलेले आहे, ते ठाणेदार होण्याच्या लायकीचे नव्हते का ? असा प्रश्न यामुळे निर्माण होत आहे. निवडणूकीच्या तोंडावरही परतवाडा येथील ठाणेदारांच्या संगीत खुर्चीचा खेळ संपत नसेल तर थेट निवडणूक आयोगालाच तक्रार करण्याची तयारी एका सामाजिक कार्यकर्त्यांने दर्शविली आहे.

# भोई समाजाचे तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण

### अवैध मासेमारी संस्थेविरोधात एल्गार



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.6 ) –** तालुक्यातील भोई समाजाला डावलून राजकीय शक्तीचा वापर करून अधिकाऱ्यांना हाताशी धरून तालुक्यातील जलाशयामध्ये अवैधरीत्या मच्छीमारी करणाऱ्या संस्थेवर कारवाई करून खऱ्या भोई समाजातील बांधवांना न्याय मिळवून देण्यात यावा, या मागणीसाठी भोई बांधव शुक्रवारपासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत.

दत्तात्रय मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्यादित हातुर्णा रजिस्टर (नंबर 528 तालुका वरुड जिल्हा अमरावती) या संस्थेमधील संस्था नोंदणी पश्चात झालेल्या सभासदांचे आयुक्त मत्स्य व्यवसाय महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार 6 सप्टेंबर 2023 रोजी तांत्रिक प्रात्याक्षिक ही बोगस झाले आहे, आणि ज्या सभासदांची तांत्रिक प्रात्याक्षिक घेतली त्यांनी ती चुकीच्या पध्दतीने दिली. असे असताना संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना क्रियाशील दाखवले, ज्यांना 50 मीटर जाळे टाकता आले नाही, नाव चालवता आलेली नाही आणि पोहता सुद्धा आलेले नाही अशा अक्रियाशील सभासदांना क्रियाशील दाखविले. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी तसेच शासनाच्या वतीने काढण्यात आलेल्या परिपत्रकामध्ये मासेमारी संस्था सक्रीय असावी असे नमूद करण्यात आले आहे. परंतु त्यामध्ये सक्रिय मासेमारांची व्याख्या काय हे नमूद करण्यात आले नाही, शासनाने नवीन परिपत्रक काढून 50 मीटर पोहणे, ट्युबवर बसून पाण्यामध्ये 50 मीटर जाळे टाकणे हे निकष लावून तांत्रिक प्रात्याक्षिक घेण्याची मागणी करण्यात आली. दत्तात्रय संस्थेमध्ये असलेले राजकीय नेते तसेच त्यांच्या नातेवाईकांना व अन्य राजकीय लोकांना संस्थेमध्ये ठेवून खऱ्या मच्छीमार भोई समाजावर अन्याय व त्यांच्या आर्थिक शोषण करणाऱ्या सभासदांचे संस्थेच्या आदर्श उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेतून तत्काळ काढण्यात यावे, यासह विविध मागण्यांसाठी भोई समाजाच्या वतीने शुक्रवारपासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करीत असल्याचे प्रदेश अध्यक्ष सहकार भारती मत्स्य प्रकोष्ठ वासुदेव सुरजुसे यांनी सांगितले.

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील आज अमरावतीत



**अमरावती –** राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांचा उद्या सोमवार, (दि. 7 ऑक्टोबर 2024) रोजीचा अमरावती दौऱ्यावर आहेत, दरम्यान दिवसभर त्यांचे उपस्थितीत विविध कार्यक्रम पार पडणार आहे.

# दुचाकी चोरीतील दोघांना अटक

### तीन दुचाकी जप्त
### बडनेरा पोलिसांची कारवाई

**अमरावती सवेरा ब्यूरो**
**अमरावती, (दि. 6) –** बडनेरा पोलिसांनी दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात दोन आरोपींना शुक्रवारी अटक केली. अमोल अंबादास नितनवरे (28, रा. मानवेळा खुर्द, ता.जि. अमरावती) व सुरज सुभाष जाधव (23, रा. भानखेडा खुर्द, ता.जि. अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून 90 हजार रुपये किमंतीच्या तिन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलिस सुत्रानुसार, 4 ऑक्टोबर रोजी अक्षय विज्ञान पटवर्धन (28, रा. भानखेडा खुर्द ता.जि. अमरावती) यांनी बडनेरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली की, 3 ऑक्टोबर रोजी रात्री 8 वाजताच्या दरम्यान त्याची एमएच 27 सीपी 1407 या क्रमांकाची दुचाकी घरासमोर ठेवले होती. त्यानंतर 4 ऑक्टोबर रोजी पहाटे त्यांना घरासमोरील दुचाकी दिसली नाही. त्यांनी दुचाकीचा शोध घेतला, परंतू ती मिळाली नाही. त्यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदवून तपास सुरु केला. सदर गुन्ह्यात पोलिस निरीक्षक सुनील चव्हान यांच्या आदेशाने डीबी पथकाने गुप्त माहितीवरून आरोपी अमोल नितनवरे व सुरज जाधवला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची चौकशी केल्यानंतर, त्यांनी दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. तसेच त्यांने आणखी दोन दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. या माहितीवरून पोलिसांनी त्याच्या ताब्यातुन एमएच 27 सीपी 1407, एमएच 27 वाय 8745 व एक नंबर प्लेट नसलेली दुचाकी अशा एकून तिन दुचाकी जप्त केल्या.

# तरुणाला 61.74 लाखाने गंडविले

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,( दि.6 )–** बॅक खात्याची माहिती घेऊन एका तरुणाची ऑनलाइन 61 लाख 74 हजार रुपयाने फसवणुक करण्यात आली आहे. भूषण निळकंठराव गोडे (32, रा. सावला, धामणगाव रेल्वे) यांच्या तक्रारीवरून दत्तापूर पोलिस ठाण्यात अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. धामणगाव रेल्वे तालुक्यातील सावळा येथे राहणारे भूषण गोडे यांच्या मोबाइलवर एका अज्ञाताने व्हीडीओ व साधे कॉल केले आणि एका प्रकरणात मुंबईत तपासण्यासाठी उपस्थित राहण्यास सांगितले. परंतू त्यांनी याकडे लक्ष दिले नाही. परंतू त्यांनी संबंधित कॉल धारकाला स्वताऱ्हासह आपल्या कुटुंबीयांची माहिती दिली. तसेच बॅक खाते व शेअर मार्केटसंबंधित माहिती सुध्दा दिली. त्यानंतर त्यांची ऑनलाइन फसवणुक करण्यात आली. या घटनेची तक्रार भूषण गोडे यांनी दत्तापुर पोलीसात केली.

# माझ्या परवानगीशिवाय शाळेत पाय टाकू नये!

### भाडूंम ढाणा येथील सहायक शिक्षकाचे फर्मान
### उल्टा चोर कोतवाल को डांटे



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.6 )–** पालक असो की, कुणीही असो माझ्या परवानगी शिवाय शाळेत पाय टाकू नये, असे फर्मानच चिखलदरा तालुक्यातील ढाकना केंद्रांतर्गत भांडूम ढाणा शाळेतील सहाय्यक शिक्षकाने काढल्याचा प्रकार समोर आला आहे. एकीकडे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे तीनतेरा वाजविले असताना उलट पालकांवर दमदाटी करणाऱ्या या शिक्षकांचा हा प्रकार हिंदीतील 'उल्टा चोर कोतवाल को डांटे', या म्हणीप्रमाणे भासत आहे. अशा अतिहुशार शिक्षकांचा वरिष्ठांनी क्लास घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

कर्तव्याला दांडी मारणाऱ्या शिक्षकांमूळेच्या नेहमीच्या अनुउपस्थितीमूळे मेळघाटातील आधीच शिक्षणाची बोंबाबोंब आहे, त्यातही शाळेला चाटा मारण्याचा प्रकार काही नवीन नाही मुख्यालयी राहण्याचे घरभाडे भेटत असतांना गावातील एखाद्या घरमलकाकडून बनावट घरभाडे पावती लावून बिल काढण्याचा प्रकार काही नवीन नाही, असे असताना आपले पाल्य रोज शाळेत जातो आणि तो कसा शिकतो, शाळेत काय शिकविले व मुलांची शाळेत काय प्रगती काय आहे, हे पाहण्यासाठी गेलेल्या पालकांना किंवा शाळेत गेलेल्या पत्रकारांना सुद्धा तुम्ही शाळेत कसे आले तुमच्याकडे शिक्षण विभागाची परवानगी आहे का ? असा प्रश्नांचा भडिमार पालकांवर करतो. त्यामुळे या शाळेत आपली मुलं शिकविणारे गरीब आदिवासी पालक आल्या पावली परत जाताहेत. आपले निष्क्रीयता लपविण्याकरिता शिक्षकाचे हे द्रविडी प्राणायम असल्याचे जगजाहिर आहे.

### उमंग होमिओ सोसायटीला केले परत

शाळेतील गुणवत्ता तपासणीचे काम उमंग होमिओ सोसायटीकडे जिल्हा परिषदेने दिली होती. सदर टीम भांडूमढाणा च्या शाळेवर गेली असता चक्क त्यांना पण परतून परवानगी दाखवा म्हणून परतून लावले होते. या सहाय्यक शिक्षकाच्या या कारभारमूळे शाळेचे मुख्याध्यापक व इतर दोन शिक्षक सुद्धा त्रस्त आहेत. हा शिक्षक स्थानिक असून तो एका बड्या नेत्याचा कार्यकर्ता असल्याचा तोरा दाखवितो. या शिक्षकावर आशीर्वाद कुणाचा ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.



अमरावती- येथील विद्यापीठ चौक स्थित मातोश्री दुर्गोत्सव मंडळ येथे कोल्हापूरच्या अंबाबाईची सुंदर अशी रांगोळी आरती नाईक, खुशी निस्ताने, दीपा मिश्रा यांनी रेखाटली. चार तासाचा वेळ आणि चार किलो रांगोळीचा वापर येथे करण्यात आला. ही रांगोळी पाहून येथे आलेले भक्तगण या कलाकारांचे कौतुक करित आहेत.

# जय माता दी च्या घोषणाने चिखलदरा पर्यटन नगरी दुमदुमली

## पदयात्रेत सात ते आठ हजार भाविक सहभागी



**महासागर प्रतिनिधी**
**चिखलदरा,( दि.6 ) –** मेळघाटातील आदिवासी बांधव तसेच या परिसरातील सर्वच नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या चिखलदरा येथील देवीच्या दर्शनाला दरवर्षी हजारो भाविकांची पायदळ वारीमध्ये सहभागी होतात. यंदाही रविवारी(दि.6) सात ते आठ हजार भाविकांनी या पदयात्रेत सहभाग नोंदविला होता. जय माता दी च्या जयघोषाने पर्यटन नगरी चिखलदरा दुमदुमली होती.

2009 पासून परतवाडा येथील नवरंग मंडळाने चिखलदरा पायदळ यात्रेची सुरुवात केली होती. या यात्रेला आता सोळा वर्षे पूर्ण झाले असून भाविकांची संख्या सुद्धा वाढत आहे हे विशेष. या पदयात्रेमध्ये परतवाडा शहरासह अचलपूर तालुक्यातील अनेक गावातील नागरिक सहभागी होतात. या सोबतच अंजनगाव, दर्यापूर, धारणी तालुक्यातील नागरिकसुद्धा या पद यात्रेमध्ये सहभागी होतात.

रविवारी ही पदयात्रा परतवाडा शहरातून सकाळी 5 वाजता सुरू झाली. परतवाडा ते चिखलदरा 31 किलोमीटरची पायदळ यात्रा असते. यामधील काही लोक 50 ते 60 किलोमीटर चालून येत यात्रेमध्ये सहभागी झाले होते. भाविक भक्तांसाठी दान दात्यांमार्फत अनेक ठिकाणी अल्पपोहाराचे स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी मेळघाटचे विद्यमान आमदार राजकुमार पटेल, माजी खासदार नवनीत राणा, माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, सेवानिवृत्ती सनदी अधिकारी रमेश मावसकर, माजी आमदार केवळ राम काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य दयाराम काळे इत्यादी पदाधिकारी यात्रेत सहभागी झाले होते.

# न.प.मध्ये प्रशासक राज, कधी संपणार विकासाचा वनवास?

## अडीच वर्ष लोटूनही निवडणुका नाही ■ शहरातील समस्या गुंडाळल्या बासनात



**विलास पाटील**
**वरुड,( दि.6 ) –** ओबीसी राजकीय आरक्षणाचा कचाट्यात अडकलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका कधी होतील यांची वाट सर्वांना लागली आहे. येथील समस्या सोडविण्यास प्रशासक राज कमी पडत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. शहरापासून विकास कोसोदूर गेला आहे. त्यामूळे विधानसभा निवडणूकीनंतर शक्य तितक्या लवकर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्याची मागणी नागरिक करित आहेत. गेल्या अडीच वर्षापुर्वी नगरपालिकेतील पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपल्याने येथील सिईओ प्रवीण मानकर कारभारी म्हणून प्रशासन पाहत आहेत.

वरुड नगरपालिकेचा 28 डिसेंबर 2021 चा कार्यकाळ संपला, येथील पालिकेचा कार्यकाळ अडीच वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटला असतांना अजूनही नगरपालिकेच्या निवडणुका झाल्या नाहीत. कार्यकाळ संपताच एक दोन महिन्यातच निवडणुका होईल अशी सर्वांनाच आशा होती. यावरून आजी–माजी नगरसेवकांनी मोर्चे बांधणी सुरू केली होती, नागरिकांच्या भेटीगाठी सुरू करण्यात आल्या होत्या, मात्र ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द होण्याचा मुद्दा राळ उठवून गेल्याने निवडणुका लांबीवर गेल्या.

त्यात आजी–माजी नगरसेवकांचा हिरमोड झाला. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा तिढा अद्याप सुटला नाही. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात असून त्यावर न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर हा तिढा सुटेल. दुसरीकडे खालून वरच्या क्रमाने निवडणूका घेतल्यापेक्षा, वरच्या क्रमाहून खालच्या टप्प्याच्या निवडणूका घेण्याचा निर्णय विद्यमान सरकारने घेतल्याने, आधी लोकसभा, मग विधानसभा व नंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होतील. आज न उद्या निवडणूका होतील या आशेने गावपुढाऱ्यांनी अनेकदा आपले खिसे रिकामे केले, परंतू निवडणूका झाल्याच नाही, अनेक पुढाऱ्यांनी तर निवडणूकीआधीच राजकीय संन्यास घेतला. तरी काही पुढारी अजूनही तग धरुन आहेत. प्रशासक राज मध्ये विकास कामांची दैना झाली असून सामान्य जनतेची कुठेच सुनावणी होत नसल्याचे दिसत आहे.

### रस्त्यावरील सांडपाणी दुर्गंधीमुळे त्रस्त

निवडणूक लांबल्याने नगरपालिकेवर प्रशासकीय राजवट आणखी काही महिने कायम राहणार आहे. शहरात अनेक समस्या आहे, रस्त्याच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराची थर्ड पार्टी ऑडिट करण्यासाठी तहसील कार्यालयासमोर आंदोलन सुद्धा करण्यात आले होते. त्याचे काय झाले हे अद्यापही कळले नाही, रस्त्यावर वाहणारे सांडपाण्याच्या दुर्गंधीमूळे नागरिक त्रस्त आहेत. परंतू तक्रार करायची तरी कुणाला असा प्रश्न सामान्यजनाला पडलेला आहे.

### कर्मचाऱ्यावर वचक नाही

कर्मचारी हा कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नाही, त्यांच्यावर कुणाचाच वचक राहिलेला नाही. कर्मचारी जबाबदारीने काम करत नाही. समस्या सांगायच्या कुणाला असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडत आहे. नगरसेवक होते तेव्हा वार्डातील समस्या त्यांच्याकडे मांडता येत होत्या. तर नगराध्यक्षाकडे जायचे पण आता नगरसेवक ही नाही व नगराध्यक्षही नाही, त्यामुळे समस्या मांडायच्या कुणाकडे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

# युवकाचा शॉक लागून मृत्यू

## वरुड येथील घटना



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.6 )–** शहरातील पीडी कन्या शाळे मागील परिसरात रहात असलेल्या 19 वर्षीय युवकाला पाण्याची मोटर सुरू करताना विजेचा शॉक लागू त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार (दि.4 ला) सकाळच्या सुमारास घडली, या घटनेमुळे शहरात एकच खडबड उडाली आहे. जय हेमंत शंबेकर (वय.19, रा.एकदरा, ह.मु.वरूड) असे दुर्दैवी घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. शहरातील पीडी कन्या शाळेमागील परिसरात तो राहत होता. घटनेच्या वेळी जय चे वडील हेमंत शंबेकर हे शेतात व आई शारदा शंबेकर ह्या बचत गटाच्या कामाने बाहेर गेल्या होत्या. सकाळी 11 वाजताच्या सुमारास नळ आल्याने जय हा नेहमीप्रमाणे मोटर सुरू करायला गेला, मात्र याचवेळी त्याचा घात झाला. यावेळी त्याला जोरदार विजेचा धक्का लागला, यातच तो खाली पडला. ही घटना परिसरातील नागरिकांच्या लक्षात येताच त्याला तातडीने वरूड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

